॥ मा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

Phone : (02462) 229294

**EXAMINATION DEPARTMENT**

Website: srtmun.ac.in

Fax : (02462) 229572

e-mail:directorboee@srtmun.ac.in


संदर्भ / परीक्षा / २०१८–१९ / 104 दि.२० / ०४ / २०१९ (15)

प्रति,

प्राचार्य

सर्व संलग्नीत महाविद्यालये,

सर्व संचालक, विद्यापीठ संकुले व उपकेंद्र लातुर

प्र.प्राचार्य न्यु मॉडेल डीग्री कॉलेज हिंगोली

विषय:— दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी लेखनीक पुरविणे बाबत.

संदर्भ:— सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परीपत्रक क्र. न्यायक्र—२०१४ प्र.क्र१ / अक२दि.१८मार्च २०१४

महोदय,

उपरोक्त विषयी सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागाचे परीपत्रक प्राप्त झाले असुन या परीपत्रकानुसार दृष्टीहीन / अल्पदृष्टी,अस्थीव्यंग, सेरेब्रल पालसी आणि डिस्लेक्सियाने बाधीत झालेल्या व्यक्तीना लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास त्यांच्या मागणी प्रमाणे परीक्षेसाठी लेखनिक पुरविण्याबाबत कळविले आहे.

उपरोक्त परीपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे यातील तरतुदीनुसार परीक्षेसाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना लेखनिक तसेच इतर सोयीसुविधा देण्यात याव्यात तसेच ही बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणुन द्यावी.

संचालक

परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव:

१) मा. कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ

२) मा. कुलसचिव प्रस्तुत विद्यापीठ

३) केंद्रीय मुल्यांकन केंद्र प्रस्तुत विद्यापीठ.

४) सर्व अधिक्षक परीक्षा विभाग

दृष्टीहीन, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग,सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित झालेल्या व्यक्ती लिहीण्यासाठी सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परिक्षेसाठी लेखनिक पुरविणेबाबत.

## महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः न्यायाप्र -२०१४/प्र.क्र.१/अ.क.२

मंत्रालय विस्तार इमारत,मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

तारीख: १८ मार्च, २०१४

वाचा :-

१) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५

२) अपंग कल्याण आयुक्तालय यांचे अकआ/प्र-७/लेखनिक/सुविधा/२००६-०७/२९५१, दि.२० डिसेंबर,२००६ परिपत्रक

३) अपंग कल्याण आयुक्तालय यांचे अकआ/प्र-७/लेखनिक/सुविधा/ डिस्लेक्सिया/ २०११-१२/२३६६, दि.२२ जून,२०११ चे शुध्दीपत्रक

४) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे क्र.अपंग-२०११/प्र.क्र.१/२०११/आस्था-२, दि.२३ मे,२०११चे पत्र

५) रिट याचिका क्र.३२९४/२०१० व इतर जनहित याचिका बाबत मा.उच्च न्यायालयाचे दि. २९ एप्रिल,२०११ चे आदेश

६) रिट याचिका क्र.३२९४/२०१० व इतर जनहित याचिका बाबत मा.उच्च न्यायालयाचे दि.५ ऑगस्ट,२०११ चे आदेश

७) शासन परिपत्रक क्रमांक :- न्यायाप्र -२०११/प्र.क्र.९१ / सुधार -३, १७ ऑगस्ट, २०११

८) केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार यांचे कार्यालयीन आदेश दि.२६ फेब्रुवारी, २०१३

प्रस्तावना -: अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग अधिनियम) १९९५ मधील कलम क्र.५ व ६ नुसार अपंग व्यक्तींना शालेय, महाविद्यालयीन, पूर्व प्रवेश परिक्षा तसेच स्पर्धा परिक्षेसाठी लेखनिक उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तथापि अशा सूचना संबंधित प्राधिकाऱ्यांना वेळोवेळी देऊनही अपंग व्यक्तींना लेखनिक उपलब्ध करुन देताना समस्या निर्माण होत असल्याचे तसेच काही स्पर्धा परिक्षांमध्ये लेखनिक उपलब्ध करुन दिला नसल्याचे निदर्शनास आले. मा. उच्च न्यायालयानेही वरील अनु.क्र.६ येथे नमूद केलेल्या याचिका प्रकरणी दि.५ ऑगस्ट,२०११ रोजी अपंग व्यक्तींना सर्व परिक्षांमध्ये लेखनिक उपलब्ध करुन देण्याबाबत शासन स्तरावरुन सूचना देण्याचे निदेश दिले. त्यास अनुसरुन या विभागाच्या दि. १७ ऑगस्ट,२०११ च्या परिपत्रकान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या.

तथापि, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील सुमोटो याचिका क्र. २०१३/७९३८ यामध्ये दिलेल्या अंतरिम निर्णयात लेखनिक उपलब्ध करुन देण्याबाबत सुधारित सूचना निर्गमित करण्याबाबत आदेशित केले आहे. तसेच केंद्र शासनानेही दि. २६.०२.२०१३ च्या कार्यालयीन आदेशान्वये लेखनिक उपलब्ध करुन देण्याबाबत विविध सूचना केलेल्या आहे. या सर्व बाबींचा एकत्रित विचार करुन उपरोक्त दि १७.ऑगस्ट , २०११चे परिपत्रक अधिक्रमीत करुन नव्याने सुधारित परिपत्रक निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.